# फळसेवाडी हितकारी संस्था
## सर्वसाधारण सभा

दिनांक 18 फेब्रुवारी 1996.

उपरोक्त संस्थेची "आमदार श्री नारायण राणे, पशुसंर्वधन दुग्ध विकास मंत्री, पालकमंत्री – सिंधूदूर्ग" यांचा सत्कार समारंभ व वाडीतील सभासद ग्रामस्थ मंडळीचे (बंधू-भगिनींचे) स्नेहसंमेलन आयोजित करण्याबद्दल सभा दिनांक 18 फेब्रुवारी 1996 रोजी बोलविण्यात आली.

खालील सभासद बंधू उपस्थित होते.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 5. श्री वासूदेव बाबू राणे |
| 2. श्री प्रताप विठोबा राणे | 6. श्री उदय भगवान राणे |
| 3. श्री दत्ताराम विष्णू सावंत | 7. श्री भगवान रामचंद्र साटम |
| 4. श्री अभयनाथ भगवान साटम | |

उपरोक्त संस्थेची सर्वसाधारण सभा वीर कोतवाल उद्यान, दादर – पश्चिम, मुंबई येथे श्री प्रताप विठोबा राणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. वरील सर्व सभासद उपस्थित होते व खालील निर्णय घेण्यात आला.

हा सत्कार समारंभ दिनांक 28 मार्च 1996 रोजी घेण्यात यावा.
या समारंभाच्या खर्च पूर्ततेसाठी रु.50/- इतके स्विकारण्यात यावे.
तसेच ही सभा संस्थेमध्ये काही शिल्लक असल्यास खर्च करण्यास अनुमती देत आहे असे सांगण्यात आले.

तसेच तत्पूर्वी दिनांक 3 मार्च 1996 रोजी शिरोडकर हॉल येथे मिटींग घेऊन पुढील कार्यक्रम ठरवावा अशी विनंती करण्यात आली. श्री उदय भगवान राणे, खजिनदार यांना शिरोडकर हॉलचे बुकींग करण्यास सांगण्यात आले. श्री प्रताप विठोबा राणे यांनी मा नारायण राणे यांच्या सत्काराची तारीख करण्याबाबत विनंती करण्यात आली.

अश्या तऱ्हेने या विषयांबर सांगोपांग चर्चा होऊन अध्यक्षांनी 6:30 वाजता मिटींग संपली असे जाहीर केले.

---

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(49 to 50)